# इयत्ता सहावी

# कृती संशोधन प्रकल्प विषय (2022–23)

## वर्तमान पर्यावरण नैतिकता

### पार्श्वभूमी

- *निवासी इमारतींच्या परिसरामध्ये पावसाळ्यापूर्वी झाडांची छाटणी होते, तेव्हा मैना व बुलबुल यांसारख्या पक्ष्यांची घरटी पडतात आणि त्यांची पिल्ले कावळे खातात. शेजारच्या मंदिरात पूजा करणाऱ्या लोकांना पिल्लांचे ओरडणे ऐकू येते; परंतु त्यांच्यावर काहीही परिणाम होत नाही आणि पिल्लांना वाचविण्याचा कोणताही प्रयत्न केला जात नाही.*
- *गृहसंकुलांमध्ये राहणाऱ्या मांजरी आणि कुत्र्यांना मासळी बाजार, मंदिरे, सार्वजनिक मैदाने इत्यादी सार्वजनिक ठिकाणी स्थलांतरित केले जाते. येथून त्यांना शहराबाहेरील उकिरड्यामध्ये टाकले जाते आणि त्यातील कित्येकांचा शेवटी उपासमारीने मृत्यू होतो.*
- *जंगलात लागलेल्या वणव्यांमुळे अनेक वन्य वनस्पती, पक्षी आणि प्राणी यांचा मृत्यू होतो.*
- *विविध जलस्रोतांमध्ये तेलाचे अवशेष व गाळ सोडल्याने हजारो जलचर प्रजाती मृत्यू पावतात.*

पर्यावरणीय समस्यांची अशी इतर उदाहरणे तुम्ही पाहिली आहेत का? हे बरोबर आहे का? हे टाळता येईल का? हे का टाळले पाहिजे? आपल्याला नीती, नैतिकता, जागरूकता, नियम, कायदे यांची जाणीव राखलेली दिसते का? पर्यावरणाला इजा पोहोचविणाऱ्याला शिक्षा होताना दिसते का? बहुतेक नाही. पण हे कुठेतरी थांबवायला हवे!

पर्यावरणीय समस्या म्हणजे आपल्या मनातील समस्यांचे बाह्य स्वरूप आहे. या समस्या आपल्या विचारांवर आणि वागणुकीवर अवलंबून आहेत. पर्यावरणीय अनीती मानवी संस्कृतीचा नाश करते आणि शेवटी मानवी अस्तित्वाच्याच विनाशाचे कारण बनते. पर्यावरणाचे रक्षण करणे व त्यास हानीपासून वाचविणे, यासाठी आपण आपली भूमिका बजावणे अत्यावश्यक आहे.

हे साध्य करण्यासाठी पर्यावरणविषयक नैतिकता, कायदे, नियम आणि कायद्यांचे पालन, साधेपणाची राहणी आणि शाश्वत जीवनशैली आचरणे आवश्यक आहे.

### प्रस्तावना

पर्यावरणविषयक वर्तमान परिस्थिती व समस्या समजून घेणे, पर्यावरणशास्त्राची तत्त्वे व पर्यावरणीय समस्यांचे निर्मूलन करणारी तत्त्वे समजून घेणे, त्याचा वापर करून पर्यावरणीय समस्यांचे निर्मूलन करणे, पर्यावरणाची व सजीवांची परिस्थिती सुधारणे, आजच्या व पुढच्या पिढीसाठी संसाधनांचे रक्षण करणे, ही वर्तमान पर्यावरण नैतिकता या विषयाची उद्दिष्टे आहेत.

मानव हा पृथ्वीवरील एकमेव प्राणी नाही, तर पृथ्वीवरील इतर सजीवांसारखा तोही एक सजीव आहे, या सत्याची जाणीव पक्की करणे, हा या विषयाचा हेतू आहे. निसर्ग केवळ मानवाच्या फायद्यासाठी म्हणून मौल्यवान नाही, तर निसर्ग उपजतच मौल्यवान आहे, हे ओळखणे महत्त्वाचे आहे.

### उद्दिष्टे

- पर्यावरणाच्या मूल्याचे वर्णन करण्यासाठी विद्यार्थ्यांना पर्यावरणाची संकल्पना आणि परिभाषा समजण्यास मदत करणे.
- पर्यावरण नैतिकतेची वैशिष्ट्ये समजून घेणे.
- पर्यावरणातील वर्तमान घडामोडींचे मूल्यांकन करण्यासाठी पर्यावरण नैतिकतेची तत्त्वे वापरणे.
- विद्यार्थ्यांना त्यांची स्वतःची पर्यावरणीय मूल्ये स्पष्टपणे

समजून घेण्यास व दैनंदिन निर्णय घेताना पर्यावरणीय नैतिकता लागू करण्यास प्रोत्साहित करणे.

- समाजात पर्यावरणीय नैतिकतेबद्दल जागरूकता निर्माण करणे.

### व्याख्या

- **नैतिकता :** ज्याला नैतिक तत्त्वज्ञान असेही म्हटले जाते, ते म्हणजे चांगले आणि वाईट आचरण, योग्य आणि अयोग्य मूल्ये यांचा अभ्यास होय.
- **नैतिकता आणि नीतिशास्त्र :** चांगले आणि वाईट किंवा योग्य आणि अयोग्य यांतील फरक ओळखण्यासाठी याचा उपयोग होता.
- **तत्त्वज्ञान :** पर्यावरणासंदर्भात नैतिकदृष्ट्या योग्य व अयोग्य वर्तन, विशिष्ट पद्धतीचे आचरण व त्याबद्दलची जाणीव निर्माण करणारी मूल्ये, आपण कसे वागले पाहिजे, या विषयांचा अभ्यास होय.

### पर्यावरण नैतिकता म्हणजे काय?

पर्यावरण नैतिकता शास्त्र पर्यावरण आणि मानव यांच्यातील नात्याचा अभ्यास करते. सध्याच्या आणि भावी पिढ्यांसाठी पर्यावरण सुरक्षित आणि संरक्षित ठेवण्यासाठी एखाद्याने कसे वागले पाहिजे आणि कोणते नियम आणि नैतिक मूल्ये जपणे आवश्यक आहे, हे ते स्पष्ट करते.

- मानवी उपभोगासाठी जंगले तोडावीत का?
- भावी पिढ्यांसाठी संसाधने जतन करण्यासाठी आज मानवाने साधी राहणी अंगीकारणे आवश्यक आहे का?

पर्यावरणीय नैतिकतेचे तीन दृष्टिकोन आहेत.

- मानवकेंद्री (अँथ्रोपोसेंट्रिक)
- जैवकेंद्री (बायोसेंट्रिक)
- पर्यावरणकेंद्री (इकोसेंट्रिक)

- **मानवकेंद्री** दृष्टिकोन म्हणजे, जो मानवांना निसर्गापेक्षा श्रेष्ठ मानतो आणि निसर्ग हा केवळ मनुष्याच्या उपभोगासाठी आहे, असा विश्वास बाळगतो.
- **जैवकेंद्री** म्हणजे, हा विश्वास की सर्व सजीव समान आहेत आणि सर्व सजीवांना समान अधिकार आहेत. सखोल पर्यावरणशास्त्र, याअनुसार निसर्ग म्हणजे मानवी आणि मानवेतर सजीवांचे एक परस्पर संबंधित असे संतुलन आहे. सर्व प्राणिमात्रांना स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे, भले त्यांचा मानवासाठी उपयोग असो वा नसो. मानवेतर सजीवांचा विनाश करण्याचा मानवाला कोणताही अधिकार नाही.
- **पर्यावरणकेंद्री** हा एक सर्वांगीण सिद्धांत आहे, ज्यानुसार संपूर्ण पर्यावरण, त्यातील सर्व सजीव आणि निर्जीव घटक हे समान अधिकारांस पात्र आहेत.

पर्यावरण नीतिशास्त्र हा विषय आंतरशाखीय आहे. पर्यावरण–कायदा, पर्यावरण–समाजशास्त्र, पर्यावरण–अर्थशास्त्र, पर्यावरण–भूगोल, कृषी, उद्योग, भू–अभियांत्रिकी, वैद्यक इत्यादींसारख्या क्षेत्रांवर आणि इतर विविध विषयांवर पर्यावरण नीतिशास्त्राचा प्रभाव पडतो. पर्यावरणविषयक असे अनेक निर्णय आहेत, जे मानवाने नैतिकतेच्या दृष्टिकोनातून घेणे आवश्यक आहे.

### पर्यावरणाविषयी निर्णय घेण्यास मदत करणारी नैतिक तत्त्वे :

पर्यावरणाविषयी निर्णय घेण्यास मदत करणारी तीन मुख्य नैतिक तत्त्वे आहेत.

- पर्यावरणीय न्याय आणि संसाधन शाश्वती (Environmental justice and Sustainability)
- पुरेसा पुरवठा आणि सहानुभूती (Sufficiency and Compassion)
- एकता आणि सहभाग (Solidarity and Participation)

ही तत्त्वे आपल्याला योग्य आणि अयोग्य कृतीमधील फरक जाणून घेण्यास मदत करतात.

नैतिक तत्त्वे ही समस्येचे मूल्यमापन, निरसन, तसेच इतर निर्णय घेणे यासाठी वापरली जाऊ शकतात.

1) **पर्यावरणीय न्याय आणि संसाधन शाश्वती :**

पर्यावरणीय न्याय म्हणजे सर्व सजीवांना समान वागणूक मिळावी आणि त्यांना संसाधनांची समान उपलब्धता मिळावी. हे तत्त्व प्राणीहित आणि भूतदया यास महत्त्व देते.

पर्यावरणीय निर्णय हा पर्यावरणीय न्याय यावर आधारित असावा, यासाठी आपण काही प्रश्न विचारले पाहिजेत –

- प्रस्तुत परिस्थितीसंबंधी सर्व मानवांना समान वागणूक दिली जाते आहे का? नसेल तर का नाही? उदा. वरिष्ठ आणि वंचित, खेड्यातील आणि शहरातील लोक इत्यादी.
- मानव, वनस्पती आणि प्राणी यांसारख्या सर्व सजीवांना प्रस्तुत परिस्थितीत समान वागणूक दिली जाते का? नसेल तर का नाही? उदा. जंगलात लावलेला वणवा औद्योगिकीकरणासाठी सोयीस्कर ठरू शकतोड; परंतु तो अधिवास, प्राणी आणि वनस्पती नष्ट करतो.

**संसाधन शाश्वती :** भविष्यातील पिढ्यांची गरज लक्षात घेऊन सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करणे, अशी संसाधन शाश्वतीची व्याख्या केली जाऊ शकते. आपण आज अनेक संसाधने वापरून ती वेगाने कमी करीत आहोत, पण नैसर्गिकरीत्या तेवढ्याच वेगाने ती निर्माण होत नाहीत. यामुळे भविष्यातील पिढ्यांना त्यांची कमतरता प्रचंड प्रम ाणात जाणवेल. पर्यावरणीय निर्णय घेताना संसाधन शाश्वतीचे तत्त्व लागू करण्यासाठी, आपण काही प्रश्न उपस्थित केले पाहिजेत–

1. आपल्यासमोर असलेल्या समस्यांचे तत्काळ आणि दीर्घकालीन परिणाम काय आहेत?

उदा. जीवाश्म इंधनाचा आज मोठ्या प्रमाणात होणारा अपव्यय, भविष्यातील त्याच्या कमतरतेची समस्या निर्माण करेल. जमिनीची होणारी धूप कमी केली नाही, तर भविष्यात शेतीसाठी लागणाऱ्या मातीच्या टंचाईची समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकते.

2. आपल्यासमोर असलेल्या पर्यावरणीय समस्येचा परिणाम आज कोणावर झाला आहे आणि भविष्यात तो कोणावर होऊ शकतो, याचा गांभीर्याने विचार करणे आज गरजेचे आहे.

उदा. वेगाने होणारे शहरीकरण आज अनेकांना घरे पुरवेल, परंतु भविष्यात हिरवळ आणि जैवविविधता नष्ट करेल.

### 2) पुरेसा पुरवठा आणि सहानुभूती

**पुरेसा पुरवठा :** सर्व प्रकारच्या सजीवांना जगण्यासाठी पुरेशी संसाधने मिळण्याचा अधिकार आहे. त्यामुळे कोणीही कोठलीही वस्तू वाया घालवू नये किंवा जा गोष्टी सर्वांनी वापरावयाच्या आहेत अशा गोष्टींचा साठा करू नये. यासाठी जगण्याकरिता आवश्यक असलेल्या वस्तूंचा वापर सर्वांनी एकत्रितपणे करावा व राहणीमान साधे ठेवावे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला साधनसंपत्तीचा पुरेसा पुरवठा होत आहे, याची खात्री करावी. आपण जेव्हा वंचित व्यक्तींच्या गरजा पुरवतो, तेव्हा आपण पुरेसेपणाचे नैतिक तत्त्व आचरणात आणत असतो. हे तत्त्व आपल्याला आणखी कोणाकोणाचा विचार करणे आवश्यक आहे आणि इतरांविषयी आपली नैतिक कर्तव्ये कोणती आहेत, याचा विचार करण्यास मदत करते. हे तत्त्व अमलात आणण्यासाठी आपण विचारले पाहिजे –

- आपल्या निर्णयामुळे संबंधित व्यक्तींना जीवनावश्यक गोष्टींचा पुरेसा पुरवठा होईल ना?
- आपण संसाधने वाया घालवत आहोत किंवा गरजेपेक्षा जास्त वापरत आहोत का? आपण संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करीत आहोत का?

सहानुभूती म्हणजे मानवेतर सजीवांचे महत्त्व नैतिकदृष्ट्या मानवांच्या बरोबरीचे आहे. शेवटी, मानवाचे भविष्य इतर सर्व सजीवांवर अवलंबून आहे. पर्यावरणविषयक निर्णय घेताना सहानुभूतीचे तत्त्व लागू करण्यासाठी आपण विचारले पाहिजे–

आपल्या कृतीमुळे बाधित होणाऱ्या मानवेतर सजीवांसंबंधात आपले कर्तव्य काय?

उदाहरणार्थ, जंगलतोडीमुळे जैवविविधतेचा नाश होत असेल, तर आपले कर्तव्य काय?

2. इतर प्राण्यांच्या रक्षणासाठी, विशेषत: नामशेष होण्याचा धोका असलेल्या प्राण्यांच्या अस्तित्वासाठी आपण कोणती पावले उचलली पाहिजेत? आपण वन्यजीवांसाठी पुरेशा नैसर्गिक अधिवासांचे जतन केले आहे का?

### 3) एकता आणि सहभाग

एकता : आपण इतरांशी कसे वागतो, हे ठरविण्यासाठी आपण एकतेचा भाव वापरतो. आपण एका कुटुंबाचा भाग

आहोत, एका जैविक संस्थेचा भाग आहोत, एक स्थानिक समुदाय, राष्ट्रीय समुदाय आणि जागतिक समुदाय यांचासुद्धा एक भाग आहोत. एकतेचा भाव आपल्याला या विस्तृत समुदायाचा विचार करण्यास भाग पाडतो व आपल्याला इतरांच्या हिताचा विचार करण्यास प्रवृत्त करतो. पर्यावरणविषयक निर्णय घेताना हे एकतेचे तत्त्व लागू करण्यासाठी आपण विचारले पाहिजे–

- प्रस्तुत परिस्थितीमध्ये मानवी सहभागी कोण आहेत?
- वनस्पती आणि प्राणी यांसारखे मानवेतर सहभागी कोण आहेत?
- पर्यावरणातील कोणते घटक सहभागी आहेत?
- कमकुवत, वंचित आणि असुरक्षित असलेले काही सहभागी आहेत का?

सहभाग हे नैतिक तत्त्व वापरणे म्हणजे एखाद्या घटनेत सहभागी होणाऱ्या सर्व मानवी, अमानवी, सजीव, निर्जीव घटकांचा निर्णय घेताना विचार करणे व त्या सर्वांच्या हिताचा विचार करणे. निर्णय कसा घेतला जातो, याबद्दल या सर्वजणांनी जागरूक असणे आवश्यक आहे. खऱ्याखुऱ्या सहभागासाठी पारदर्शकता आवश्यक आहे. पर्यावरणविषयक निर्णयांमध्ये सहभागाचे तत्त्व लागू करण्यासाठी आपण विचारले पाहिजे –

- या निर्णयातील सर्व सहभागींना निर्णयप्रक्रियेत स्वतःचे मत मांडण्याचा अधिकार आहे का?
- असे काही सहभागी आहेत का जे स्वतःचे प्रतिनिधित्व करू शकत नाहीत? किंवा ज्यांची शक्ती कमी आहे? निर्णयप्रक्रियेत त्यांच्या हिताचे प्रतिनिधित्व कसे केले जाईल? उदा. मुके प्राणी आणि पक्षी.

## पर्यावरणाबद्दल नैतिक निर्णय घेण्याच्या पद्धती :

जेव्हा आपण नैतिक समस्येचा विचार करतो, तेव्हा आपण तीन पद्धतींची मदत घेतो – आदेश, परिणाम आणि चारित्र्य

1) **आदेश :** परिणाम काहीही का असेनात, पण ज्या गोष्टी आपण कोणत्याही परिस्थितीत केल्याच पाहिजेत अशा गोष्टी म्हणजे आदेश होत. पर्यावरणीय नैतिकतेच्या दृष्टीने कोणालाही हानी पोहोचवू नये, हा एक आदेश आहे. सर्व सजीवांना समान अधिकार आहेत आणि म्हणून त्यांना समान न्याय देण्यासाठी आवश्यक आहे, की आपण त्यांना हानी पोहोचवू नये.

2) **परिणाम :** आपल्या कृतींच्या परिणामांचा आपण काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. अशा प्रकारे, वाईट परिणामांपेक्षा चांगले परिणाम देणारी एक योग्य नैतिक कृती आपण ठरवू शकतो. उदा. माणसाच्या आर्थिक फायद्यासाठी प्राण्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष होऊ शकते. येथे नुकसानीचे स्वरूप प्राण्यांच्या अकाली मृत्यूमध्ये, शारीरिक वेदनेमध्ये किंवा वंचित लोकांचे हक्क नाकारण्यामध्ये असू शकते. पर्यावरणीय कृतीमध्ये जेव्हा अशी हानी होते, ती नकारात्मक परिणामांमुळे हानिकारक ठरते. जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठी कार्य करणे हे सकारात्मक परिणाम देणाऱ्या कृतीचे उदाहरण आहे.

3) **चारित्र्य :** इतरांप्रति व निसर्गाप्रति आपली कृती ही आपले चारित्र्य दर्शविते. आपले वर्तन न्यायपूर्ण, नीति पर्यावरणसहिष्णू, आपले मन इतर सजीवांप्रति उदार असणे, हे अत्यंत आवश्यक आहे.

## विद्यार्थ्यांनी काय करावयाचे आहे?

- मुख्य विषयावर आधारित कोणताही एक उपविषय निवडावा व पर्यावरणीय नैतिकतेच्या दृष्टिकोनातून तो हाताळावा.
- प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, मित्र, पालक, तज्ज्ञ यांचा एक गट तयार करावा.
- स्वतःचे निवासस्थान, शाळा, बाजारपेठ, जन्मठिकाण या ठिकाणांपैकी एक परिसर निवडावा.
- परिसर अभ्यास, उपलब्ध संसाधने यांचा वापर करून सर्वेक्षण करावे आणि माहिती गोळा करावी.
- पर्यावरणविषयक समस्या/उणिवा ओळखाव्यात, जेथे पर्यावरणविषयक नैतिकतेचे पालन केले जाऊ शकते.
- माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पुढील तीन नैतिक तत्त्वांचा वापर करावा.
  1) पर्यावरणीय न्याय आणि संसाधन शाश्वती
  2) पुरेसा पुरवठा आणि सहानुभूती
  3) एकता आणि सहभाग

- मानवकेंद्री, जैवकेंद्री आणि पर्यावरणकेंद्री या दृष्टिकोनांचा विचार करून समस्येचे निराकरण करावे. सुचविलेला उपाय मानवी, मानवेतर सजीव (वनस्पती आणि प्राणी) आणि परिसंस्था या तिन्हींच्या हिताचा असणे आवश्यक आहे.
- योजना अमलात आणाव्यात.
- योजना सुधारण्यासाठी कृतीचे विश्लेषण करावे.
- नैतिक उपायांबद्दल परिसरात जागरूकता आणावी, जेणेकरून ही नैतिकता समाजामध्ये रुजेल.
- अहवाल लिहावा.

### काही उदाहरणे :

**उदाहरण** 1:

एका गृहसंकुलाच्या आवारात पावसाळ्यापूर्वी वृक्षतोड झाली. मैना आणि बुलबुल या पक्ष्यांची घरटी खाली पडली आणि त्यांची पिल्ले कावळ्यांनी खाल्ली. शेजारच्या मंदिरात पूजा करणाऱ्या एका माणसाने पिल्लांचा आक्रोश ऐकला, पण त्याने पिल्लांना वाचवण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही.

**प्रश्न** :

- वृक्षछाटणी का केली जाते? किती वेळा केली जाते? (वृक्षछाटणी मानवाच्या सोयीसाठी केली जाते म्हणून ती कृती मानवकेंद्रित आहे.)
- वृक्ष, इतर सजीवांसाठी निवासस्थाने पुरवतात का? झाडावरील पक्ष्यांचा प्रजनन काळ कोणता? (वृक्षछाटणी दरम्यान जैवकेंद्रित दृष्टिकोन लागू करणे आवश्यक आहे.)
- पक्ष्यांच्या प्रजननाच्या हंगामानंतर छाटणी करता आली असती का? (कृतीच्या परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे.)
- पक्ष्यांच्या घरट्यांचा नाश टाळण्यासाठी छाटणी काळजीपूर्वक केली जाऊ शकते का? जेणेकरून घरट्यांना इजा पोहोचणार नाही (सकारात्मक परिणाम मिळविण्यासाठी आवश्यक आहे.)
- जैवविविधतेला हानी पोहोचू नये म्हणून झाडाचा प्रकार, त्यावरील जैवविविधता आणि त्यांचा अधिवास, छाटणीसाठी सुयोग्य वेळ इत्यादी मार्गदर्शन करणारी माहिती पुस्तिका (डेटा बुक) तयार होऊ शकते का?
- पर्यावरणीय नैतिकतेच्या जागरूकतेमुळे घरटे आणि पिल्ले वाचवता आली असती का? (कोणालाही हानी पोहोचवू नये, हे तत्त्व आचरणात आणण्याची गरज आहे.)
- निसर्गासंबंधित आपले वागणे विचारपूर्वक का आणि कसे असावे? वरील गोष्टींबाबत समाजात जागरूकता कशी आणता येईल, जेणेकरून पर्यावरणीय नैतिकतेचे पालन केले जाईल? (पर्यावरण नैतिकता विकसित करून पर्यावरणसहिष्णू चारित्र्य घडते.)
- लोकांमध्ये पर्यावरण नैतिकता का व कशी विकसित करावी, जेणेकरून ते पर्यावरणसंवर्धन कार्यात सक्रियपणे सहभागी होतील?

**उदाहरण** 2 :

तुमच्या परिसरातील पर्यावरण कार्यकर्त्याच्या कार्याचा अभ्यास करा. असा अभ्यास आपल्या स्वतःच्या परिसरातील पर्यावरणसमस्येकडे नैतिकतेच्या दृष्टिकोनातून पाहायची संधी देतो. अशाने पर्यावरणसंवर्धनाच्या कार्याला आणि कृतीला प्रेरणा मिळते.

**प्रश्न :**

- पर्यावरण कार्यकर्ता पर्यावरणातील कोणत्या समस्येवर कार्य करतो?
- कोणते नैतिक दृष्टिकोन या व्यक्तीच्या कार्याला प्रेरित करतात?
- एखादी व्यक्ती कार्यकर्त्याने सुरू केलेल्या उपक्रमात कशा प्रकारे सहभागी होऊ शकते किंवा तो उपक्रम दुसऱ्या ठिकाणी कसा सुरू करू शकते?
- त्यांच्या कार्याचा पर्यावरणातील समस्येवर काय परिणाम झाला आहे?

**उदाहरण** 3 :

भटक्या मांजरी आणि कुत्र्यांचे सार्वजनिक ठिकाणी किंवा डंपिंग ग्राऊंडवर स्थलांतर करण्याबाबतचा अभ्यास. भटक्या जनावरांसंबंधात कृती करणाऱ्या विविध गटांमधील परस्परसंवाद, वादविवाद आणि त्यांची नैतिक तत्त्वे समजून घ्या (मानवकेंद्रित गट आणि जैवकेंद्रित गट).

**प्रश्न :**

- स्थलांतरित प्राण्यांचे पुढे काय होते? (पाठपुरावा करणे)
- स्थलांतरित केलेल्या ठिकाणचे इतर प्राणी आणि लोक त्यांना स्वीकारतात का?
- त्यांना नवीन ठिकाणी अन्न, निवारा आणि आरोग्य मिळते का?
- नवीन ठिकाणी ते जगतात का?
- ही समस्या हाताळण्याचा उत्तम मार्ग कोणता आहे? (नसबंदी, लसीकरण, दत्तक घेणे, निवारागृहे सुरू करणे.)
- प्राण्यांवरील क्रौर्याबाबत कायदे आहेत का?
- कायद्यांची अंमलबजावणी कशी होते आणि त्याचे परिणाम काय आहेत?
- इतर ठिकाणी किंवा शहरांमध्ये भटक्या जनावरांचा प्रश्न कशा प्रकारे हाताळला जातो? पर्यावरण नैतिकतेची अंमलबजावणी होते का?

**उदाहरण** 4 :

एखाद्या संस्थेच्या दैनंदिन व्यवहारातील पर्यावरणीय नैतिकतेच्या भूमिकेचे मूल्यांकन करा. खालीलपैकी काही परिस्थितीचे विश्लेषण करणे आणि उपाययोजना करणे, प्रदूषण, कचरा विल्हेवाट, प्रवास, वंचित सदस्यांची सद्यःस्थिती.

## इतर उदाहरणे :

**परिसरासंबंधित समस्या :**

अनैतिक खाण व्यवसाय, जमिनीच्या वरच्या थरातील मातीचे नुकसान / पाझर खड्डे नसणे / संसाधनांचा अतिरिक्त साठा आणि अपव्यय / संसाधन कमतरता / शहरीकरणाचा विस्तार / रान वणवे / अधिवास नाश / जंगलतोड / प्रदूषण / तेलगळती.

**आजूबाजूच्या मानवेतर सजीवांविषयी काही गैरप्रकार :**

- वनस्पती आणि प्राण्यांच्या ऋतुचक्रात (बायो–रिदममध्ये) अडथळा आणणाऱ्या क्रिया. उदा. झाडांभोवती गुंडाळलेले दिवे, प्रकाश आणि ध्वनिप्रदूषण.
- गायीगुरांचा व्यापार, प्राणिजन्य वस्तूंचा व्यापार, जनावरांच्या तान्ह्या पिल्लांची विक्री, जनावरांचे वाहतुकीदरम्यान होणारे अपघात, प्राण्यांची तस्करी इत्यादी.
- पशुसंवर्धनातील गैरप्रकार. उदा. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय/ आजारी पाळीव प्राणी, घोडे, उंट, हत्ती, गाढवे इत्यादी.
- प्राण्यांवरील क्रूरता. उदा. मधमाश्या, कीटक, पक्षी, बैलांची झुंज, कोंबड्यांची झुंज, वेगवेगळ्या चालीरीती, प्राण्यांची पैदास, माकडांसारख्या प्राण्यांवर वैद्यकीय प्रयोग.

**कार्य करण्यासाठी इतर उदाहरणे :**

- वृक्षांची छाटणी, वृक्षारोपण नीती, स्थानिक जाती निवडणे, वृक्षतोड रोखणे.
- पर्यावरणविषयक सजगता, पर्यावरण मूल्यशिक्षण, शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार, शून्य कचरा जीवनशैली, हुशार शहर (स्मार्ट सिटी).
- वंचित मुले, महिला, वृद्ध, अपंग, मतिमंद, आदिवासी, आजारी, गरीब इत्यादींचे जीवनमान उंचाविणे.
- पर्यावरणविषयक नैतिकता आणि वैद्यकीय क्षेत्र/प्रवास/व्यवसाय/शेती/खाद्य पद्धतींचा परस्पर संबंध.
- शाळा, रुग्णालये, ग्रीन बिल्डिंग इत्यादी संस्थांमधील नैतिक विश्लेषण.
- दुर्मीळ प्रजातींच्या संरक्षणाचा नमुना अभ्यास.
- मुख्य विषयाशी संबंधित इतर कोणताही उपविषय.

## संदर्भ :


- *https://www.google.com*
- *https://www.scu.edu/environmental-ethics/environmental-activists-heroes-and-martyrs/*
- *https://www.scu.edu/media/ethics-center/environmental-ethics/Philosophy-Lesson-Plan.pdf*
- *https://www.internationalconference.in/XVIIIšIC/TS4/MayurišBarmanš115-119š.pdf*
- *https://www.scu.edu/environmental-ethics/short-course-in-environmental-ethics/lesson-three/*


■